सत्यमेव जयते

# आर्थिक गणना-२००५
# अस्थायी निष्कर्ष
## महाराष्ट्र राज्य

# ECONOMIC CENSUS-2005
# PROVISIONAL RESULTS
## MAHARASHTRA STATE



अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
नियोजन विभाग,महाराष्ट्र शासन, मुंबई.

DIRECTORATE OF ECONOMICS & STATISTICS,
PLANNING DEPARTMENT,GOVERNMENT OF MAHARASHTRA,MUMBAI.

**D. R. Bhosale**
Director & Additional Census Commissioner

सत्यमेव जयते

**Directorate of Economics & Statistics,**
Maharashtra state

# *PREFACE*

The Central Statistical Organisation (CSO) conducted Fifth Economic Census in 2005 in all the states /UTs in collaboration with state Directorate of Economics and Statistics (DES). Accordingly, the DES, Government of Maharashtra participated in the Fifth Economic Census.

2. The fieldwork of the Fifth Economic Census in Maharashtra was started in May, 2005 and was completed by September, 2005. The Economic Census covered all agricultural and non-agricultural enterprises excepting those engaged in crop production and plantation. The first Economic Census was conducted in 1977, second in 1980, third in 1990 and fourth in 1998.

3. In the Fifth Economic Census the information was collected through four schedules viz 1) House list 2) Enterprise schedule 3) Enterprise Abstract schedule and 4) Address slip. Address Slip Schedule was introduced for the first time in which addresses of the enterprises employing 10 or more workers were collected . The Directory of Enterprises will be generated from address slip. For the first time, the Intelligence Character Recognition (ICR) Technology is being used for processing the data collected in the Fifth Economic Census.

4. This Report is based on the Quick Manual Tabulation of data collected in the Enterprise Abstract Schedule. The detailed results would be available after complete processing of data.

5. I would like to put on record the encouragement and guidance provided by the CSO, Government of India & Chief Secretary and Principal Secretary, Planning Department, Government of Maharashtra without which the conduct of Economic Census work would not have been possible. I appreciate all the officials of this Directorate of Economics & Statistics for the hard work they have put in for bringing out this Report.

DRBhosale

**August , 2006.**

**D. R. Bhosale**

# पाचवी आर्थिक गणना-२००५
# शीघ्र तक्तीकरणावर आधारित निष्कर्ष
# (अस्थायी)

**प्रस्तावना**

भारत सरकारची केंद्रीय सांख्यिकी संघटना व राज्य शासनाचे अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मूलभूत सांख्यिकी आकडेवारी गोळा करणे व ती संकलित करण्यामध्ये प्रमुख भूमिका बजावत असतात. अर्थव्यवस्थेतील कृषि क्षेत्र व संघटित बिगर-कृषि क्षेत्रातील किमान आवश्यक आकडेवारी उपलब्ध आहे. परंतु बिगर-कृषि असंघटित क्षेत्र हे विखुरलेले असल्यामुळे त्याबाबतच्या माहितीमध्ये बऱ्याच उणीवा आहेत. आर्थिक गणनेमुळे बिगर-कृषि क्षेत्रातील मूलभूत माहिती उपलब्ध होत असल्याने ही उणीव भरून काढण्यास मदत होते.

२. आर्थिक गणना ही देशाच्या भौगोलिक सीमांतर्गत असलेल्या सर्व उपक्रमांची अधिकृत गणना होय. उपक्रमांची सविस्तर पश्चात पाहणी घेण्यासाठी अद्ययावत आकडेवारी उपलब्ध होण्यास आर्थिक गणनेची मदत होते. त्याचप्रमाणे निरनिराळ्या आर्थिक कार्यात गुंतलेल्या उपक्रमांची संख्या व वितरण या विषयीची माहिती आर्थिक गणनेतून मिळते. आर्थिक गणनेचे महत्त्व लक्षात घेऊन केंद्रीय सांख्यिकी संघटनेने १९७६ मध्ये 'आर्थिक गणना' ही योजना सुरू केली. त्यानंतर केंद्रीय सांख्यिकी संघटनेने १९७७, १९८०, १९९० व १९९८ या वर्षात चार आर्थिक गणना आयोजित केल्या.

**पाचवी आर्थिक गणना**

३. त्यानंतर २००५ मध्ये सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशात पाचव्या आर्थिक गणनेचे आयोजन करण्यात आले. पाचव्या आर्थिक गणनेत कृषि व बिगर-कृषि क्षेत्रातील सर्व आर्थिक कार्यांचा (पीक उत्पादन व मळे वगळून) समावेश करण्यात आला होता. उपक्रम म्हणजे वस्तूंचे उत्पादन किंवा मालाचे वितरण आणि/किंवा सेवा या आर्थिक कार्यात गुंतलेला व सामान्यत: नियमितपणे वेतनावर कामगार कार्यरत असलेला किंवा नसलेला घटक होय. आर्थिक गणनेत अर्थ-व्यवस्थेतील कृषि (पीक उत्पादन व मळे वगळून) व बिगर-कृषि क्षेत्रातील केवळ स्वत:च्या उपभोगासाठी असलेले उपक्रम वगळून इतर

# Fifth Economic Census - 2005
# Results based on Quick Tabulation (Provisional)

**Introduction**

The Central Statistical Organisation (CSO) of the Government of India and the Directorate of Economics and Statistics (DES) of the State Government are playing the key role in collection and compilation of basic statistical data. Adequate data is available in agricultural sector and organized non-agricultural sector. However, there are considerable data gaps in respect of unorganized non-agricultural sector due to its scattered nature. The Economic Census (EC) helps in bridging the gap by providing basic data on non-agricultural sector.

2. The Economic Census is the complete count of all entrepreneurial units located within the geographical boundaries of the country. The Economic Census helps to generate update trend of enterprises for detailed follow-up surveys. It provides data on number and distribution of enterprises engaged in different types of economic activities. Looking into the importance of the Economic Census, the CSO launched a scheme of 'Economic Census' in 1976. Since then, the CSO has conducted four Economic Censuses in the years 1977, 1980, 1990 and 1998.

**Fifth Economic Census**

3. In 2005 the Fifth Economic Census was conducted in all the States/Union Territories. All economic activities (agriculture and non-agriculture) except those involved in crop production and plantation were covered under the Fifth Economic Census. An enterprise is an entrepreneurial unit, which is engaged in production and/or distribution of goods and/or services and may have or not hired worker on a fairly regular basis. The Economic Census covered all the enterprises including establishments (excluding those involved in crop

सर्व वस्तू उत्पादन, वितरण व सेवा पुरविणे या उपक्रमांचा समावेश करण्यात येतो. राज्यात व केंद्रशासित प्रदेशात पाचव्या आर्थिक गणनेची अंमलबजावणी करण्यासाठी अर्थ व सांख्यिकी संचालनालय प्रमुख संस्था होती. राज्यातील आर्थिक गणनेशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांसाठी आर्थिक गणनेची संकल्पना, व्याख्या व पत्रकांतील माहिती गोळा करण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण केंद्रिय सांख्यिकी संघटनेने आयोजित केले होते. त्यानंतरचे राज्यातील दुय्यम स्तरावरील अधिकारी म्हणजे चार्ज अधिकारी, पर्यवेक्षक व प्रगणक यांचेसाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण संबंधित अर्थ व सांख्यिकी संचालनालयाने आयोजित केले होते. राज्यात पाचव्या आर्थिक गणनेचे क्षेत्रीय काम मे २००५ मध्ये सुरू करून सप्टेंबर, २००५ पर्यंत पूर्ण करण्यात आले. माहिती गोळा करण्यासाठी १) घरयादी, २)उद्योग प्रपत्र ३) उद्योग गोषवारा ४) पत्ताचिठ्ठी या चार प्रपत्रकांचा वापर करण्यात आला. पाचव्या आर्थिक गणनेत पत्ताचिठ्ठी या प्रपत्रकाचा प्रथमच समावेश करण्यात आला, त्यात ज्या उपक्रमांत दहा किंवा अधिक कामगार कार्यरत आहेत अशा मोठ्या उपक्रमांची निर्देशिका तयार करण्यासाठी माहिती संकलित करण्यात आली. पाचव्या आर्थिक गणनेत ग्रामीण भागात गणना खेडे हे तर नागरी भागात राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेच्या क्षेत्र संकार्य प्रभागाने तयार केलेले यु.एफ.एस. गट असे प्राथमिक घटक होते.

**पाचव्या आर्थिक गणनेचे निष्कर्ष**

४. आर्थिक गणने दरम्यान संकलित करण्यात आलेल्या माहितीचे ICR तंत्रज्ञानाद्वारे संस्करण करण्याचे काम प्रगतिपथावर असून सविस्तर निष्कर्ष तयार करण्यास अजून काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. हे विचारात घेऊन, आर्थिक गणनेचे शीघ्र निष्कर्ष उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून उद्योग गोषवारा प्रपत्रकात संकलित करण्यात आलेल्या माहितीचे देशातील सर्व राज्यांतील/केंद्रशासित प्रदेशातील अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत शीघ्र तक्तीकरण करण्यात आले. शीघ्र तक्तीकरणावर आधारित निष्कर्ष पुर्णत: अस्थायी स्वरुपाचे असून सविस्तर तक्तीकरण उपलब्ध झाल्यानंतर बदलण्याची शक्यता आहे.

production and plantation), which are engaged in production and/or distribution of goods and/or services other than for the sole purposes of own consumption. The Directorate of Economics and Statistics were the Nodal Agencies for executing Fifth Economic Census in the States/Union Territories. The Central Statistical Organisation conducted training programmes regarding concepts and definitions and canvassing of all the schedules to the States officials involved in the census. Further training programmes for lower level officials like Charge Officers, Enumerators and Supervisors were organized by the respective DES staff. The field work of Fifth Economic Census was started in May, 2005 and was over by September, 2005 in the State. The information was collected through 4 schedules viz. 1) House List 2) Enterprise Schedule 3) Enterprise Abstract and 4) Address Slip. An Address Slip was a new schedule introduced for Fifth Economic Census, in which, the information from enterprises employing 10 or more workers was collected for compilation of a directory of larger enterprises. In the Fifth Economic Census, census village was the primary unit in rural areas while the Urban Frame Survey Block (UFSB) formed by the Field Operation Divisions of National Sample Survey Organization (NSSO) was the primary unit in urban areas.

**Results of Fifth Economic Census**

4. The entire data collected under the census is in process by applying Intelligence Character Recognition (ICR) Technology and may take some more time for detailed results and with a view to making quick estimates available for the census, the information collected in the enterprise abstract schedule is quickly tabulated by all the DES/Union Territories in the country. The results based on this tabulation are purely provisional and may change after detailed tabulation is available.

## राष्ट्रीय स्तर

५. केंद्रिय सांख्यिकी संघटनेने जून २००६ मध्ये पाचव्या आर्थिक गणनेचे राष्ट्रीय स्तरावरील अस्थायी निष्कर्ष प्रकाशित केले असून त्याची काही ठळक वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

## उपक्रम

६. अस्थायी निष्कर्षानुसार देशातील पीक उत्पादन व मळे वगळता इतर निरनिराळ्या आर्थिक कार्यात गुंतलेल्या उपक्रमांची संख्या ४२१.२ लाख आहे. यापैकी २५८.१ लाख उपक्रम (६१.३ टक्के) ग्रामीण भागात आहेत. तर, १६३.१ लाख (३८.७ टक्के) उपक्रम नागरी भागात आहेत. जवळपास ८५ टक्के उपक्रम बिगर-कृषि कार्यात गुंतलेले आहेत. तर, उर्वरित उपक्रम कृषि कार्यात (पीक उत्पादन व मळे वगळून) गुंतलेले आहेत. १० किंवा अधिक कामगार असलेल्या उपक्रमांची संख्या ५.८३ लाख असून ती देशातील एकूण उपक्रमांच्या १.४ टक्के आहे. या पैकी २.२५ लाख उपक्रम ग्रामीण भागात तर ३.५८ लाख उपक्रम नागरी भागातील आहेत. उपक्रमांच्या संख्येनुसार तामिळनाडू (एकूण उपक्रमांच्या १०.५६ टक्के हिस्सा), महाराष्ट्र (१०.३९ टक्के हिस्सा), पश्चिम बंगाल (१०.१७ टक्के), आंध्रप्रदेश (९.५५ टक्के) व उत्तर प्रदेश (९.५३ टक्के) ही देशातील पाच प्रमुख राज्ये आहेत.

## रोजगार

७. देशातील सर्व उपक्रमांत मिळून कार्यरत असलेल्या व्यक्तींची एकूण संख्या ९८९.७ लाख असून ती ग्रामीण व नागरी भागात सारख्या प्रमाणात आहे. वेतनावर कार्यरत असलेल्या व्यक्तींचे प्रमाण एकूण कार्यरत व्यक्तींच्या ५२ टक्के आहे. प्रौढ स्त्री कामगारांचे एकूण कार्यरत व्यक्तींशी प्रमाण १९ टक्के आहे, तर ग्रामीण व नागरी भागात हे प्रमाण अनुक्रमे २४ टक्के व १४ टक्के आहे. राष्ट्रीय पातळीवर प्रती उपक्रम रोजगाराचे सरासरी प्रमाण २.३५ आहे. तर ग्रामीण व नागरी भागात हे प्रमाण अनुक्रमे १.९४ आणि २.९९ आहे. एकूण रोजगारात ११.९५ टक्के वाटा असणारे महाराष्ट्र देशातील प्रथम क्रमांकाचे राज्य आहे. त्या खालोखाल तामिळनाडू (९.९७ टक्के ), पश्चिम बंगाल (९.४२ टक्के), आंध्र प्रदेश (८.९६ टक्के) व उत्तर प्रदेश (८.६३ टक्के) यांचा क्रमांक लागतो.

## All-India level

5. The Central Statistical Organisation published all-India provisional results of Fifth Economic Census in June, 2006 and some salient features are given below:

## Enterprises

6. As per the Provisional Results, there are 421.2 lakh enterprises in the country engaged in different economic activities other than crop production and plantation. Out of these, 258.1 lakh enterprises (61.3 per cent) are in the rural areas and 163.1 lakh enterprises (38.7 per cent) in the urban areas. About 85 per cent of the enterprises are engaged in non-agricultural activities and the remaining in the agricultural activities other than crop production and plantation. There are about 5.83 lakh enterprises, which employed 10 or more workers, accounting 1.4 per cent of the total enterprises. Out of these, 2.25 lakh enterprises are in the rural areas and 3.58 lakh enterprises are in the urban areas. In terms of number of enterprises, top 5 States in the country are Tamil Nadu (having a share of 10.56 per cent) of total enterprises followed by Maharashtra (share of 10.39 per cent), West Bengal (10.17 per cent), Andhra Pradesh (9.55 per cent) and Uttar Pradesh (9.53 per cent).

## Employment

7. The total number of persons working in all the enterprises is 989.7 lakh more or less equally distributed in rural and urban areas. The hired workers accounted for about 52 per cent of the total persons employed. The adult female workers accounted for about 19 per cent of the total persons employed and the corresponding figures in the rural and urban areas are 24 per cent and 14 per cent respectively. At all-India level the average employment per enterprise is 2.35 and the corresponding figures for rural and urban areas are 1.94 and 2.99 respectively. In terms of total employment, Maharashtra is the first State having share of 11.95 per cent of the total employment in the country followed by Tamil Nadu (9.97 per cent), West Bengal (9.42 per cent), Andhra Pradesh (8.96 per cent) and Uttar Pradesh (8.63 per cent).

## महाराष्ट्र राज्याचे निष्कर्ष

८. महाराष्ट्र राज्यातील पाचव्या आर्थिक गणनेची ठळक वैशिष्ट्ये खालील तक्ता क्रमांक १ मध्ये दिली आहेत.

## Maharashtra's Result

8. The salient features of the Fifth Economic Census for Maharashtra State are presented in Table No.1, below.

**तक्ता क्रमांक/ TABLE NO. 1**

**महाराष्ट्र राज्यातील पाचव्या आर्थिक गणनेची ठळक वैशिष्ट्ये (पीक उत्पादन व मळे वगळून)**

**Salient features of the Fifth Economic Census(Excluding crop production and plantation)**

*(आकडे संपूर्णत: अस्थायी स्वरुपाचे आहेत)* *(Figures are purely provisional)*

| अनु. Sr. No. | बाब | ग्रामीण Rural | शहरी Urban | एकूण Combined | Item |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अ) उपक्रमांची संख्या (हजारांत) | 2,262 | 2,113 | 4,375 | a) Number of enterprises (in 000) |
| | ब) टक्केवारी | 51.70 | 48.30 | 100.00 | b) Percentage share |
| 2 | कृषि उपक्रमांची टक्केवारी | 26.60 | 1.72 | 14.60 | Percentage of agricultural enterprises |
| 3 | अ) उपक्रमांची संख्या (हजारांत) | | | | a)Number of enterprises (in 000) |
| | i) मोकळ्या जागेतील | 453 | 324 | 777 | i) Without premises |
| | ii) दहा किंवा अधिक कामगार असलेले | 29 | 57 | 86 | ii) Having 10 or more workers |
| | ब) एकूण उपक्रमांतील टक्केवारी | | | | b) Percentage share in total enterprises |
| | i) मोकळ्या जागेतील | 20.02 | 15.34 | 17.76 | i) Without premises |
| | ii) दहा किंवा अधिक कामगार असलेले | 1.29 | 2.67 | 1.96 | ii) Having 10 or more workers |
| 4 | आर्थिक गणना १९९८च्या तुलनेत उपक्रमांचा सरासरी वार्षिक वृद्धीदर | 4.95 | 3.86 | 4.41 | Average annual growth rate in enterprises over Economic Census 1998 |
| 5 | अ) कार्यरत असलेल्या एकूण व्यक्तींची संख्या (हजारांत) | 4,625 | 7,201 | 11,827 | a) Number of persons employed (in 000) |
| | ब) टक्केवारी | 39.11 | 60.89 | 100.00 | b) Percentage share |
| 6 | कार्यरत असलेल्या एकूण व्यक्तींपैकी वेतनावर कार्यरत असलेल्या व्यक्तींची टक्केवारी | 46.00 | 69.10 | 60.10 | Percentage of hired workers in the total persons employed |
| 7 | कार्यरत असलेल्या एकूण व्यक्तींपैकी प्रौढ स्त्रीयांची टक्केवारी | 16.60 | 13.50 | 14.70 | Percentage of total adult female workers in the total persons employed |
| 8 | आर्थिक गणना १९९८ च्या तुलनेत एकूण रोजगाराचा सरासरी वार्षिक वृद्धीदर | 3.29 | 0.91 | 1.79 | Average annual growth rate in total employment over Economic Census 1998 |

९.  पाचव्या आर्थिक गणनेनुसार राज्यातील उपक्रमांची एकूण संख्या ४३,७४,७६७ इतकी आहे व ती चौथ्या आर्थिक गणनेच्या ३२,३४,०२२ उपक्रमांच्या तुलनेत ३५.२७ टक्क्यांनी जास्त आहे. त्याचप्रमाणे सर्व उपक्रमांत कार्यरत असलेल्या व्यक्तींची संख्या १०४.४५ लाखांवरून (चौथी आर्थिक गणना) १३.४ टक्क्यांनी वाढून ११८.२६ लाख इतकी झाली. ग्रामीण व नागरी क्षेत्रानुसार उपक्रमांची संख्या खालील तक्ता क्रमांक २ मध्ये दर्शविली आहे.

9. As per the Fifth Economic Census, 2005 the number of enterprises in the State is 43,74,767 as against 32,34,022 observed in the Fourth Economic Census showing an increase of about 35.27 per cent. Similarly, the number of persons working in all the enterprises increased from 104.45 lakh (Fourth Economic Census) to 118.26 lakh showing an increase of 13.4 per cent. The rural and urban area wise growth in number of enterprises is shown in Table No.2 below.

**तक्ता क्रमांक / TABLE NO. 2**

**उपक्रमांच्या संख्येतील शेकडा वाढ**

**Percentage growth in number of Enterprises**

(आकडे संपूर्णत: अस्थायी स्वरुपाचे आहेत) *(Figures are purely provisional)*

| | प्रकार | आर्थिक गणना २००५ मधील उपक्रमांची संख्या No. of Enterprises in Economic Census 2005 | आर्थिक गणना १९९८ मधील उपक्रमांची संख्या No. of Enterprises in Economic Census 1998 | शेकडा वाढ Percentage Growth | Type |
|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण/Rural | i) कृषि | 6,02,477 (26.63) | 4,88,692 (30.29) | 23.28 | Agricultural |
| | ii) बिगर-कृषि | 16,59,558 (73.37) | 11,24,660 (69.71) | 47.56 | Non-agricultural |
| | एकूण | 22,62,035 | 16,13,352 | 40.21 | Total |
| नागरी/Urban | i) कृषि | 36,360 (1.72) | 28,840 (1.78) | 26.07 | Agricultural |
| | ii) बिगर-कृषि | 20,76,372 (98.28) | 15,91,830 (98.22) | 30.44 | Non-agricultural |
| | एकूण | 21,12,732 | 16,20,670 | 30.36 | Total |
| एकूण/Total | i) कृषि | 6,38,837 (14.6) | 5,17,532 (16) | 23.44 | Agricultural |
| | ii) बिगर-कृषि | 37,35,930 (85.4) | 27,16,490 (84) | 37.53 | Non-agricultural |
| | एकूण | 43,74,767 | 32,34,022 | 35.27 | Total |

टीप:- **कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात**

Note:-Figures in bracket represent percentage share

१०.  एकूण उपक्रमांमधील कृषि उपक्रमांचे प्रमाण चौथ्या आर्थिक गणनेच्या १६ टक्क्यांच्या तुलनेत १४.६ टक्के इतके झाले आहे, ग्रामीण भागात हेच प्रमाण २६.६ टक्के इतके आहे, तर नागरी भागात हे प्रमाण केवळ १.७ टक्के इतके आहे.

10. The proportion of agricultural enterprises to total enterprises is 14.6 per cent as against 16 per cent observed in Fourth Economic Census. Similar percentage in rural areas is 26.6 per cent as against only 1.7 per cent in urban areas.

**उपक्रमांची संख्या**

**Number of enterprises**

**पाच प्रमुख जिल्हे**

**Five major Districts**

| | | |
|---|---|---|
| मुंबई | 568367 (12.99) | Mumbai |
| कोल्हापूर | 370412 (8.47) | Kolhapur |
| पुणे | 344934 (7.88) | Pune |
| ठाणे | 317476 (7.26) | Thane |
| औरंगाबाद | 262114 (5.99) | Aurangabad |

कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात

Figures in bracket represent percentage share




११. राज्यातील उपक्रमांची जिल्हानिहाय संख्या विचारात घेता मुंबई जिल्ह्याचा ५.६८ लाख उपक्रमांसह प्रथम क्रमांक लागतो. तर, त्या खालोखाल कोल्हापूर जिल्हा (३.७० लाख), पुणे (३.४५ लाख), ठाणे (३.१७ लाख) व औरंगाबाद (२.६२ लाख) यांचा क्रमांक लागतो.

11. If we consider the districtwise number of enterprises in the State, Mumbai district tops the list having 5.68 lakh enterprises followed by Kolhapur district (3.70 lakh), Pune (3.45 lakh), Thane (3.17 lakh) and Aurangabad (2.62 lakh).







## रोजगार

१२. या सर्व उपक्रमांत कार्यरत असलेल्या व्यक्तींची ग्रामीण व नागरी भागनिहाय संख्या तक्ता क्रमांक ३ मध्ये दर्शविली आहे.

## Employment

12. The rural and urban areawise number of persons working in all these enterprises is presented in table No.3 below.

**तक्ता क्रमांक /TABLE NO.3**

**सर्व उपक्रमांत कार्यरत असलेल्या व्यक्तींच्या संख्येतील शेकडा वाढ**

**Percentage Growth in Persons working in all Enterprises**

*(आकडे संपूर्णत: अस्थायी स्वरुपाचे आहेत)* *(Figures are purely provisional)*

| तपशील | आर्थिक गणना २००५ Economic Census 2005 | आर्थिक गणना १९९८ Economic Census 1998 | शेकडा वाढ Percentage Growth | Item |
|---|---|---|---|---|
| | | **ग्रामीण/Rural** | | |
| I) कार्यरत असलेल्या व्यक्तींची एकूण संख्या | 46,25,398 | 36,88,254 | 25.41 | Total Persons working |
| II) विना-वेतन व्यक्ती | 24,97,541 | 22,46,232 | 11.19 | Non-Hired Persons |
| III) विना-वेतन कार्यरत असलेल्या व्यक्तींची एकूण व्यक्तींशी टक्केवारी | 54.0 | 60.90 | | Percentage of Non-Hired persons to total persons |
| | | **नागरी/Urban** | | |
| I) कार्यरत असलेल्या व्यक्तींची एकूण संख्या | 72,01,168 | 67,56,464 | 6.58 | Total Persons working |
| II) विना-वेतन व्यक्ती | 22,24,073 | 19,94,327 | 11.52 | Non-Hired Persons |
| III) विना-वेतन कार्यरत असलेल्या व्यक्तींची एकूण व्यक्तींशी टक्केवारी | 30.88 | 29.52 | | Percentage of Non-Hired persons to total persons |
| | | **एकूण/Total** | | |
| I) कार्यरत असलेल्या व्यक्तींची एकूण संख्या | 1,18,26,566 | 1,04,44,718 | 13.23 | Total Persons working |
| II) विना-वेतन व्यक्ती | 47,21,614 | 42,40,559 | 11.34 | Non-Hired Persons |
| III) विना-वेतन कार्यरत असलेल्या व्यक्तींची एकूण व्यक्तींशी टक्केवारी | 39.92 | 40.60 | | Percentage of Non-Hired persons to total persons |

१३. पाचव्या आर्थिक गणनेनुसार सर्व उपक्रमांत कार्यरत असलेल्या व्यक्तींची संख्या ११८.२६ लाख इतकी आहे. जी चौथ्या आर्थिक गणनेत १०४.४४ लाख इतकी होती. जरी राज्यातील सर्व उपक्रमांतील कार्यरत असलेल्या व्यक्तींच्या संख्येतील वाढ १३.२३ टक्के असली तरी ग्रामीण भागातील कार्यरत असलेल्या व्यक्तींचे प्रमाण २५.४ टक्क्यांनी वाढले आहे, तर नागरी भागात हे प्रमाण ६.५८ टक्के म्हणजे ग्रामीण भागातील वाढीच्या जवळपास एक चतुर्थांश आहे.

13. The number of persons working in all enterprises as per Fifth Economic Census is 118.26 lakh as against 104.44 lakh in Fourth Economic Census. Though the overall growth in number of persons working in all enterprises of the State is 13.23 per cent, the number of persons working in rural areas has increased by 25.4 per cent while the growth is 6.58 per cent, in urban area, which is almost one-fourth of the growth in rural areas.







१४. कार्यरत असलेल्या ११८.२६ लाख व्यक्तींपैकी मुलामुलींचे एकत्रित प्रमाण ७.५ टक्के आहे. राज्यातील कार्यरत असलेल्या प्रौढ स्त्री कामगारांचे एकूण कामगारांशी प्रमाण १४.७ टक्के एवढे आहे. हे प्रमाण ग्रामीण भागात १६.६ टक्के तर नागरी भागात १३.५ टक्के आहे.




14. Out of 118.26 lakh persons working the proportion of children is 7.5 per cent. The proportion of adult female amongst total workers is 14.7 per cent in the State while this percentage in rural area is 16.6 and 13.5 per cent in urban areas.

१५. जिल्हानिहाय निष्कर्ष परिशिष्टामधील चार तक्त्यांमध्ये दर्शविले आहेत. जिल्हानिहाय उपक्रमांची व एकूण कार्यरत व्यक्तींची संख्या तक्ता क्रमांक १ मध्ये दर्शविली आहे. तक्ता क्र.२ मध्ये जिल्हानिहाय मोकळ्या जागेतील उपक्रमांची टक्केवारी व १० किंवा अधिक कामगार कार्यरत असलेल्या उपक्रमांची एकूण उपक्रमांशी टक्केवारी दर्शविली आहे. तक्ता क्र. ३ मध्ये कृषि व बिगर-कृषि उपक्रमांची टक्केवारी दर्शविली आहे. तक्ता क्र.४ मध्ये प्रत्येक जिल्ह्यातील एकूण कामगारांपैकी वेतनावरील कामगारांची टक्केवारी व प्रौढ स्त्री कामगारांची टक्केवारी दर्शविली आहे.

15. The districtwise results are presented in four tables, which are enclosed in Annexes Table 1 gives the districtwise number of enterprises and total persons employed and Table 2 gives the districtwise percentage of enterprises without premises and enterprises employing 10 or more workers in total enterprises. Table 3 presents percentage of agricultural and non-agricultural enterprises. Table 4 gives percentage of hired workers and that of adult female workers in which total persons employed in each district.

१६. राज्यातील कार्यरत व्यक्तीची जिल्हानिहाय संख्या विचारात घेता मुंबई जिल्ह्याचा (२६.२६ लाख) पहिला क्रमांक लागतो. तर त्या खालोखाल पुणे जिल्हा (११.३१ लाख), ठाणे (१०.३८ लाख), कोल्हापूर (७.३४ लाख), व औरंगाबाद (५.७६ लाख) यांचा क्रमांक लागतो.

**एकूण रोजगार**

**Total Employment**

**पाच प्रमुख जिल्हे**

**Five major Districts**

| | | |
|---|---|---|
| मुंबई | 2626229 (22.21) | Mumbai |
| पुणे | 1131907 (9.57) | Pune |
| ठाणे | 1038379 (8.78) | Thane |
| कोल्हापूर | 733886 (6.21) | Kolhapur |
| औरंगाबाद | 575598 (4.87) | Aurangabad |

टीप : कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात

Note : Figures in bracket represent percentage share

16. If we consider the districtwise number of employees in the state Mumbai district tops the list having 26.26 lakh employees followed by Pune district (11.31 lakh), Thane (10.38 lakh), Kolhapur (7.34 lakh) & Aurangabad (5.76 lakh).

तक्ता क्र.१ / Table No.1

जिल्हानिहाय उपक्रमांची व कार्यरत असलेल्या व्यक्तींची संख्या (पीक उत्पादन व मळे वगळून)

**Number of enterprises and persons employed (Excluding crop production and plantation**

(आकडे संपूर्णतः अस्थायी स्वरुपाचे आहेत) (Figures are purely provisional)

| अ.क्र. Sl.No. | जिल्हा | उपक्रमांची संख्या Number of enterprises ग्रामीण Rural | शहरी Urban | एकूण Combined | एकूण रोजगार Total employment ग्रामीण Rural | शहरी Urban | एकूण Combined | District |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मुंबई | 0 | 5,68,367 | 5,68,367 | 0 | 26,26,229 | 26,26,229 | Mumbai |
| 2 | ठाणे | 60,469 | 2,57,007 | 3,17,476 | 1,85,413 | 8,52,966 | 10,38,379 | Thane |
| 3 | रायगड | 45,588 | 19,314 | 64,902 | 1,17,078 | 61,934 | 1,79,012 | Raigad |
| 4 | रत्नागिरी | 47,908 | 11,828 | 59,736 | 1,03,877 | 36,257 | 1,40,134 | Ratnagiri |
| 5 | सिंधुदुर्ग | 34,952 | 7,083 | 42,035 | 66,872 | 18,089 | 84,961 | Sindhudurg |
| **कोकण विभाग** | | **1,88,917** | **8,63,599** | **10,52,516** | **4,73,240** | **35,95,475** | **40,68,715** | **Konkan Division** |
| 6 | नाशिक | 64,396 | 93,328 | 1,57,724 | 1,42,986 | 2,90,603 | 4,33,589 | Nashik |
| 7 | धुळे | 38,208 | 21,481 | 59,689 | 69,264 | 60,369 | 1,29,633 | Dhule |
| 8 | नंदुरबार | 16,134 | 12,843 | 28,977 | 31,791 | 28,753 | 60,544 | Nandurbar |
| 9 | जळगाव | 78,774 | 56,399 | 1,35,173 | 1,32,639 | 1,36,096 | 2,68,735 | Jalgaon |
| 10 | अहमदनगर | 1,10,079 | 48,419 | 1,58,498 | 2,36,612 | 1,67,523 | 4,04,135 | Ahmednagar |
| **नाशिक विभाग** | | **3,07,591** | **2,32,470** | **5,40,061** | **6,13,292** | **6,83,344** | **12,96,636** | **Nashik Division** |
| 11 | पुणे | 1,21,727 | 2,23,207 | 3,44,934 | 3,10,966 | 8,20,941 | 11,31,907 | Pune |
| 12 | सातारा | 1,07,830 | 31,939 | 1,39,769 | 2,00,343 | 87,437 | 2,87,780 | Satara |
| 13 | सांगली | 1,28,020 | 39,148 | 1,67,168 | 2,22,133 | 97,012 | 3,19,145 | Sangli |
| 14 | सोलापूर | 1,02,400 | 54,551 | 1,56,951 | 1,82,670 | 1,92,607 | 3,75,277 | Solapur |
| 15 | कोल्हापूर | 2,91,689 | 78,723 | 3,,70,412 | 5,27,756 | 2,06,130 | 7,33,886 | Kolhapur |
| **पुणे विभाग** | | **7,51,666** | **4,27,568** | **11,79,234** | **14,43,868** | **14,04,127** | **28,47,995** | **Pune Division** |
| 16 | औरंगाबाद | 1,89,852 | 72,262 | 2,62,114 | 4,12,218 | 1,63,380 | 5,75,598 | Aurangabad |
| 17 | जालना | 43,519 | 15,789 | 59,308 | 74,177 | 51,944 | 1,26,121 | Jalna |
| 18 | परभणी | 24,283 | 20,868 | 45,151 | 39,007 | 56,144 | 95,151 | Parbhani |
| 19 | बीड | 1,40,854 | 19,910 | 1,60,764 | 2,02,269 | 59,000 | 2,61,269 | Beed |
| 20 | नांदेड | 49,440 | 33,043 | 82,483 | 81,211 | 93,074 | 1,74,285 | Nanded |
| 21 | उस्मानाबाद | 51,713 | 15,330 | 67,043 | 88,055 | 38,241 | 1,26,296 | Osmanabad |
| 22 | लातूर | 46,996 | 24,452 | 71,448 | 79,743 | 72,958 | 1,52,701 | Latur |
| 23 | हिंगोली | 15,933 | 5,436 | 21,369 | 24,019 | 15,460 | 39,479 | Hingoli |
| **औरंगाबाद विभाग** | | **5,62,590** | **2,07,090** | **7,69,680** | **10,00,699** | **5,50,201** | **15,50,900** | **Aurangabad Division** |
| 24 | बुलडाणा | 46,055 | 24,592 | 70,647 | 76,210 | 61,308 | 1,37,518 | Buldana |
| 25 | अकोला | 32,516 | 39,815 | 72,331 | 54,916 | 91,730 | 1,46,646 | Akola |
| 26 | वाशिम | 22,355 | 10,062 | 32,417 | 36,730 | 22,728 | 59,458 | Washim |
| 27 | अमरावती | 47,394 | 52,672 | 1,00,066 | 79,564 | 1,25,194 | 2,04,758 | Amravati |
| 28 | यवतमाळ | 59,512 | 29,280 | 88,792 | 99,112 | 69,146 | 1,68,258 | Yavatmal |
| **अमरावती विभाग** | | **2,07,832** | **1,56,421** | **3,64,253** | **3,46,532** | **3,70,106** | **7,16,638** | **Amravati Division** |
| 29 | वर्धा | 32,052 | 18,082 | 50,134 | 61,239 | 47,427 | 1,08,666 | Wardha |
| 30 | नागपूर | 59,075 | 1,50,415 | 2,09,490 | 1,27,178 | 3,88,988 | 5,16,166 | Nagpur |
| 31 | भंडारा | 43,753 | 15,257 | 59,010 | 83,892 | 38,639 | 1,22,531 | Bhandara |
| 32 | गोंदिया | 39,120 | 8,289 | 47,409 | 24,344 | 24,344 | 48,688 | Gondia |
| 33 | चंद्रपूर | 42,735 | 27,290 | 70,025 | 90,608 | 81,031 | 1,71,639 | Chandrapur |
| 34 | गडचिरोली | 26,704 | 6,251 | 32,955 | 3,60,506 | 17,486 | 3,77,992 | Gadchiroli |
| **नागपूर विभाग** | | **2,43,439** | **2,25,584** | **4,69,023** | **7,47,767** | **5,97,915** | **13,45,682** | **Nagpur Division** |
| **राज्य एकूण** | | **22,62,035** | **21,12,732** | **43,74,767** | **46,25,398** | **72,01,168** | **1,18,26,566** | **State Total** |

तक्ता क्र.२ / Table No.2

उपक्रमांची निवडक वैशिष्ट्ये (पीक उत्पादन व मळे वगळून)

## Selected characteristics of the enterprises (excluding crop production and plantation)

(आकडे संपूर्णत: अस्थायी स्वरुपाचे आहेत) (Figures are purely provisional)

| अ.क्र. Sl.No. | जिल्हा | मोकळया जागेतील उपक्रमांची टक्केवारी @ Percentage of enterprises without premises @ | | | १० किंवा अधिक कामगार असलेल्या उपक्रमांची टक्केवारी @ Percentage of enterprises employing 10 or more workers @ | | | District |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रामीण Rural | शहरी Urban | एकूण Combined | ग्रामीण Rural | शहरी Urban | एकूण Combined | |
| 1 | **मुंबई** | 0.0 | 13.9 | 13.9 | 0.0 | 3.2 | 3.2 | Mumbai |
| 2 | ठाणे | 34.3 | 11.0 | 15.5 | 2.9 | 2.9 | 2.9 | Thane |
| 3 | रायगड | 25.0 | 13.8 | 21.7 | 2.9 | 3.4 | 3.0 | Raigad |
| 4 | रत्नागिरी | 20.4 | 17.3 | 19.8 | 2.4 | 3.7 | 2.6 | Ratnagiri |
| 5 | सिंधुदुर्ग | 26.2 | 25.3 | 26.0 | 1.3 | 2.0 | 1.4 | Sindhudurg |
| **कोकण विभाग** | | **27.0** | **13.2** | **15.7** | **2.5** | **3.1** | **3.0** | **Konkan Division** |
| 6 | नाशिक | 11.0 | 12.3 | 11.8 | 1.9 | 2.6 | 2.3 | Nashik |
| 7 | धुळे | 31.1 | 18.4 | 26.5 | 1.2 | 2.2 | 1.6 | Dhule |
| 8 | नंदुरबार | 13.1 | 26.9 | 19.2 | 1.4 | 2.1 | 1.7 | Nandurbar |
| 9 | जळगाव | 27.5 | 25.0 | 26.4 | 0.7 | 1.5 | 1.1 | Jalgaon |
| 10 | अहमदनगर | 21.9 | 13.2 | 19.3 | 1.1 | 2.4 | 1.5 | Ahmednagar |
| **नाशिक विभाग** | | **21.8** | **16.9** | **19.7** | **1.2** | **2.2** | **1.6** | **Nashik Division** |
| 11 | पुणे | 15.6 | 14.6 | 14.9 | 2.9 | 3.2 | 3.1 | Pune |
| 12 | सातारा | 18.5 | 12.0 | 17.0 | 0.8 | 2.3 | 1.1 | Satara |
| 13 | सांगली | 11.2 | 9.6 | 10.8 | 0.5 | 2.0 | 0.9 | Sangli |
| 14 | सोलापूर | 28.1 | 9.1 | 21.5 | 0.8 | 3.1 | 1.6 | Solapur |
